दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | बुधवार दि.११ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१०४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

### मारकडवाडी गावातील गावकऱ्यांचा उठाव:याची देशपातळीवर चर्चा

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मतांचा अधिकार संपुष्ट आणण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. मारकडवाडी गावातील गावकऱ्यांनी उठाव केला. तो उठाव पाहण्यासाठी मी येथे आलो असल्याचे ते म्हणाले. नाना पटोले यांनी मारकडवाडी गावात दाखल झाल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सरकार, पोलिस प्रशासन आणि निवडणूक आयोग यांच्यावर टीका केली.भाजपच्या नेत्यांना सत्तेची गुरमी चढली असेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे. मात्र, खऱ्या अर्थाने निवडणूक आयोगाची भूमिका संशयास्पद असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. आम्ही जे आक्षेप घेतले, त्या आक्षेपाला उत्तर देण्याची मागणी त्यांनी केली. ७६ लाख मते कशी वाढली? यावर आमचा आक्षेप असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे. मॉकपोलला निवडणूक आयोग आणि पोलिसांचा विरोध का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. मारकडवाडी ग्रामस्थांनी लोकशाही वाचवण्यासाठी भूमिका घेतली आहे. आता निवडणुका पुन्हा होणार नाही, मात्र लोकांची मते जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे पटोले यांनी म्हटले आहे.

## महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान

# मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते-बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)-महाविकास आघाडीकडून संविधानाचा अवमान होत आहे. मविआच्या नेत्यांना संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, असे म्हणत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी टीका केली आहे. मविआच्या नेत्यांनी काल आमदाराकीची शपथ न घेतल्यामुळे सत्ताधारी पक्षाकडून त्यांच्यावर टीका करण्यात येत आहे. या मुद्द्यावरून बोलताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत मविआवर निशाणा साधला आहे.चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान फक्त निवडणुकीपुरते आठवते, हे त्यांनी आपल्या कालच्या कृतीतून सिद्ध केले.**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, शरद पवार यांच्याबद्दल आदर आहे मात्र, त्यांनी खोटारडे पणा करु नये. पराभवातून स्वीकारुन पुढे गेले पाहिजे त्यातून काही तरी शिकायला हवे, लोकसभा निवडणुकीत त्यांनी फेक नरेटीव्ह पसरवला होता. विधानसभेला लोकांनी त्यांना नाकारले. लोकसभेला त्यांचे ३१ खासदार निवडून आले तेव्हा त्यांनी आक्षेप घेतला नाही. त्यांच्या सर्व खासदार- आमदार यांनी राजीनामा द्यायला हवे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, वफ्फबोर्डाने बदमाशी करत जमीनी बळकावल्या आहेत. पुन्हा एकदा या सर्व गोष्टीचे ऑडिट केले पाहिजे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, विधानसभेतील नवनिर्वाचित सदस्यांना संविधानाच्या साक्षीने आमदारकीची शपथ घेणे संविधानिकदृष्ट्या आवश्यक असूनही मविआ सदस्यांनी शपथ घ्यायला नकार दिला. हा संविधानाचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान आहे. याचा निषेध करावा तेवढे कमीच आहे.उद्धवसेनेचे गटनेते आदित्य ठाकरे यांच्या



नेतृत्वात विरोधकांनी 'आय लव्ह मारकडवाडी' असे फलक झळकावले. ठाकरे म्हणाले 'आम्ही जे आमदार विजयी झालोत त्यांच्या मनातही ईव्हीएमबद्दल शंका आहे, म्हणून शपथ घेतली नाही. मारकडवाडीत मतपत्रिकेवर मतदानाची तयारी झाली होती. हे मतदान जनतेच्या मनातील शंकांना उत्तर देणार होते. पण दडपशाही करून प्रशासनाने मतदान होऊ दिले नाही.'विधानसभेचे अधिवेशन पहिल्याच दिवशी ईव्हीएमच्या मुद्द्यावरून गाजले. शनिवारी २८८ पैकी सत्ताधारी१७३ आमदारांना हंगामी विधानसभा अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी शपथ दिली. ईव्हीएमच्या मुद्द्यावरून आक्रमक महाविकास आघाडीच्या आमदारांनी मात्र शपथविधीवर बहिष्कार टाकला. विधानसभेत राष्ट्रगीत झाल्यानंतर हे आमदार बाहेर पडले. 'ईव्हीएम, निवडणूक आयोगामुळेच महायुतीला बहुमत मिळाले आहे,' असा ठपका ठेवत मतपत्रिकेवर पुन्हा निवडणूका घ्या,' अशी मागणी करत मविआच्या आमदारांनी विधिमंडळ परिसरात निदर्शने केली. विधिमंडळाच्या पायऱ्यांवरही आंदोलन केले. सोलापूर जिल्ह्यात मारकडवाडी या गावात मतपत्रिकेवर चाचणी मतदान घेण्याची प्रक्रिया प्रशासनाने दडपशाही मार्गाने उधळून लावली, असा आरोप करत विरोधकांनी प्रशासन व सरकारचा निषेध केला. दुसरीकडे, शपथविधीवर बहिष्कार टाकणे हा लोकशाहीचा अपमान आहे, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

### पवारसाहेब नौटंकी नको- बावनकुळे

**विधानसभा निवडणुकीतील अपयश लपवण्याचे काम शरद पवार, राहुल गांधी करीत आहेत. पवारांबाबत मला आदर आहे पण ईव्हीएमबाबत पवारांनी नौटंकी करु नये, असा हल्लाबोल भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी केला आहे.आघाडीचे जे उमेदवार ईव्हीएममुळे विजयी झाले आहेत, त्या सर्वांना राजीनामा द्यावेत, असे आव्हान बावनकुळे यांनी केले आहे. ते विधिमंडळ परिसरात माध्यमांशी बोलत होते.**

# ध्वजदिन निधीचे विक्रमी संकलन करत अहिल्यानगरचा राज्यात प्रथम क्रमांक

## राजभवन येथील समारंभात राज्यपालांच्या हस्ते जिल्ह्याचा सन्मान

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याने ध्वजदिन निधीचे विक्रमी संकलन करत राज्यात प्रथम क्रमांकाची कामगिरी केल्याने राजभवन येथे आयोजित सेना दिवस कार्यक्रमात राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन जिल्ह्याचा सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यावतीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्क्वॉड्रन लिडर वि.ल. कोरडे (निवृत्त) यांनी हा पुरस्कार स्विकारला. भारतीय सैन्यदल हे आपल्या देशाचा अभिमान असून देशाच्या संरक्षणाबरोबरच नैसर्गिक आपत्तींच्या काळातही आपले सैन्यदल अत्यंत अमूल्य सेवा बजावते. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करून त्यांचे जीवन सुसह्य होण्यासाठी, युद्धात अपंगत्व तसेच सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या पुर्नवसनाकरिता सशस्त्र सेना ध्वज निधीला सर्वांनी जास्तीत जास्त योगदान देण्याचे अवाहन श्री. सालीमठ यांनी गतवर्षी केले होते. त्याला जिल्ह्यातील विविध शासकीय विभाग, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.




जिल्ह्यातील सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालये, महामंडळे, सहकारी संस्था, धार्मीक संस्था, कृषी विद्यापीठ, राज्य परिवहन महामंडळ आणि नागरिकांनी ५ कोटीहून अधिक ध्वजदिन निधी संकलन करण्यात भरीव योगदान दिले. यात शिर्डी साई संस्थान, जिल्हा परिषद, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, महानगरपालिका, नगरपालिका आणि पोलीस विभागाने सर्वाधिक योगदान आहे. अहिल्यानगर जिल्ह्याने रु. १ कोटी ८४ लाख ९८ हजार उद्दिष्ट असतांना रु. ५ कोटी ८ लाख ६८ हजार ३०८ एवढा अर्थात २७५ टक्के निधी संकलित केला. लातूर ४२ लाख २२ हजार उद्दिष्ट असतांना ९७ लाख, नागपूर १ कोटी ९१ लाख ९८ हजार उद्दिष्ट असतांना ३ कोटी ९ लाख ७७ हजार, अमरावती १ कोटी १० लाख उद्दिष्ट असतांना १ कोटी ३८ लाख ८० हजार आणि कोल्हापूर जिल्ह्याने रु.१ कोटी ६० लाख ७९ हजार उद्दिष्ट असतांना रु.२ कोटी एवढा निधी संकलित केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याची कामगिरी सर्वोत्तम ठरली आहे. या कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी सालीमठ यांनी जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी,कर्मचारी आणि नागरिकांना धन्यवाद देत त्यांचे अभिनंदन केले आहे.

# बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या अटी व निकष शिथिल करणार; जीआरची अंमलबजावणी आठवड्यात होणार

## मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या सततच्या पाठपुराव्याला यश;मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजने'चे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच दरमहा २० हजार रुपये सन्मान निधी देण्याच्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रालयातील पत्रकार कक्षात येऊन पत्रकार परिषद संबोधित केली. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी आवर्जून हा मुद्दा उपस्थित केला. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या ९ मे २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात सन्मान निधी वाढविण्याची



घोषणा केली होती. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मार्च २०२४ मध्ये राज्य सरकारने राज्यातील निवृत्त पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सन्माननिधी योजनेची दरमहा देण्यात येणारी रक्कम रुपये ११ हजारांऐवजी २० हजार रुपये करण्याचा शासन निर्णय (जीआर) जारी केला. मात्र त्याची अजूनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे अध्यक्ष डोईफोडे यांनी निदर्शनास आणले. महायुती सरकारने लाडक्या बहिणींचा सन्मान केला तसा सन्मान राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा करून त्यांनाही दिलासा द्यावा, अशी मागणी डोईफोडे यांनी केली.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान निधीचे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच २० हजार रुपये दरमहा सन्माननिधी देण्यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या या घोषणेमुळे राज्यातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांना याचा फायदा होणार आहे. सन्मान निधीत वाढ करून ते ११ हजाराऐवजी २० हजार रुपये करण्यात यावे तसेच शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने पाठपुरावा केला होता. संघाच्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. यावेळी सरचिटणीस प्रविण पुरो, कोषाध्यक्ष विनोद यादव, कार्यकारिणी सदस्य खंडूराज गायकवाड, भगवान परब, अलोक देशपांडे, मनोज मोघे यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

# कोपर्डी प्रकरणातील पीडितेच्या बहिणीच्या लग्नाला मुख्यमंत्री फडणीस यांची उपस्थिती;प्रवीण दरेकर यांनी गायले मंगलाष्टक

**कर्जत । प्रतिनिधी**

कोपर्डी प्रकरणातील पीडित मुलीच्या बहिणीच्या लग्नाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी उपस्थित राहून दिलेला शब्द पाळला. यावेळी आमदार प्रवीन दरेकर यांनी मंगलाष्टक म्हटले.आज पीडित मुलीच्या बहिणीचं लग्न होतं. बबनराव सुद्रिक यांची मुलगी सपना हीचा शुभविवाह बाळासाहेब वैराळे यांचे सुपुत्र अमरदीप यांच्या बरोबर कोपर्डी (ता. कर्जत) येथील सुद्रिक कुटुंबातील मुलीचा विवाह निघोज (ता. पारनेर) येथील वराळ कुटुंबातील मुलाशी झाला. सोयीचे ठिकाण म्हणून लग्न शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे ठेवण्यात आले होते. कोपर्डीतील पीडितेच्या वडिलांचा फडणवीस यांच्याशी घटनेपासूनच कायम संपर्क राहिला आहे. त्यातच मधल्या काळात भय्यूजी महाराज यांच्यामुळे हे नाते अधिक घट्ट झाले. त्यामुळे सुद्रिक यांनी आपल्या धाकट्या मुलीच्या लग्नाचे निमंत्रण फडणवीस यांना दिले होते. त्यांनी यायचे कबुल केले होते. या लग्न सोहळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी हजेरी लावत आठ वर्षापूर्वी दिलेला शब्द पाळला. मधल्या काळात त्यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आणि कारभारही सुरू केला. मात्र, लग्नाला येतो, असा दिलेला शब्द त्यांनी पाळला. छोट्या गावातील एका साध्या लग्न समारंभाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी फौजफाट्यासह हजेरी लावत मोठा संदेश दिला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर विधान परिषद आमदार प्रवीण दरेकर व आ. प्रा रामभाऊ शिंदे हे आले होते. तर जिल्ह्यातून मा. खा. डॉ. सुजय विखे यांचे सह अनेक जन उपस्थित होते.शुभविवाह सुरू झाला मंगलाष्टका म्हणण्यासाठी अनेक जण पुढे



येत असताना यामध्ये विधान परिषद सदस्य आमदार प्रवीण दरेकर यांनी माईक मागवुन घेत चक्क मंगलाष्टका गायली यामुळे उपस्थितामध्ये कुतूहल निर्माण झाले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा देताना गेली अनेक वर्ष बबनराव सुद्रिक यांच्या कुटुंबीयाशी माझा अतिशय निकटचा संबंध आलेला आहे. त्याच्या घरच्या वाईट घटनेनंतर त्याच्या पाठीशी आम्ही सर्व जण उभे राहिलो, त्यातून जीव्हाळा निर्माण झाला.त्यामुळे विवाहाचं निमंत्रण मिळाल्यानंतर या ठिकाणी उपस्थित वधू - वराला आशीर्वाद देण्यासाठी आलो असल्याचे म्हटले.

कोपर्डी येथील एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेवरून पुढे मराठा आरक्षणाचे आंदोलन पेटले. राज्यात अनेक महामोर्चे निघाले. नंतरच्या काळात जरांगे पाटील यांच्या आंदोलनाने पुन्हा एकदा मराठा समाज एकत्र झाला मात्र या आंदोलनात जरांगे यांनी अनेकदा फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका केली. यामुळे मराठा समाजात फडणवीस खलनायक असल्याचे चित्र उभे राहिले होते. यामुळे या लग्नाला उपस्थित राहून फडणवीस यांनी आपण मराठा समाजासोबत असल्याचा संदेश दिल्याचे मानले जात आहे.

## आपण तरी देशाच्या जनतेची दिशाभूल करू नका

# शरद पवारांच्या मतांच्या शंकेवर फडणवीसांनी दिले आकडेवारीत उत्तर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात ठिकठिकाणी महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण होते. पण निकाल अनुकूल लागला नाही. हे संशयास्पद असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी महायुतीला मिळालेल्या मतांच्या आकडेवारीवर देखील भाष्य करत प्रश्न उपस्थित केला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. जनतेची दिशाभूल करू नका, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.



शरद पवारांच्या विधानावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मते मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीच सांगितली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०२४ च्या लोकसभेत भाजपाला मते १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण काँग्रेसला मते ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मते आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मते आणि ८ जागा. २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मते होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मते होती आणि जागा ४ आल्या. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे, असे म्हणत टोला देखील लगावला आहे.पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार म्हणाले, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर राज्यात एक उत्साहाचे वातावरण असते. पण महाराष्ट्रात तसे वातावरण दिसत नाही. पण उगीचच आरोप करणे योग्य नाही. माझ्याकडे यासंबंधी अधिकृत अशी माहिती नाही. आम्ही केवळ काही आकडेवारी गोळा केली. त्यात निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांना मते किती पडली? व त्यांचे किती जण निवडून आले? हे पडताळून पाहिले. त्यात काँग्रेसला ८० लाख मते पडली. पण त्यांची केवळ १५ उमेदवार निवडून आले. याऊलट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला काँग्रेसहून १ लाख कमी म्हणजे ७९ लाख मते पडली. पण त्यांचे तबब्ल ५७ उमेदवार निवडून आले. म्हणजे ८० लाख वाल्यांचे १५ व ७९ लाख वाल्यांचे ५७.

दुसरीकडे, आम्हाला म्हणजे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला ७२ लाख मते पडली. आमचे उमेदवार निवडून आले १०. याऊलट अजित पवार गटाला ५८ लाख मते पडली. पण त्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. म्हणजे ७२ लाख वाल्यांचे १० आणि ५८ लाख वाल्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. यात काहीतरी चूक आहे. हातात काहीतरी ठोस आधार असेपर्यंत त्यावर बोलणे योग्य नाही. पण मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत, असे शरद पवार म्हणाले.

संपादकीय

# राज्यमाता ते सुंदरी...

राज्य सरकारने निर्णयांचा जो काही धडाका लावला आहे तो आता आचारसंहिता लागू झाल्यावरच थांबेल. तोवर या महायुती सरकारने 'कल्याणकारी निर्णयां'चे 'कार्पेट बॉंबिंग' करून एकही विषय किंवा समाजगट शिल्लक ठेवायचाच नाही, असे ठरविलेले दिसते. गाय हा पशू महाराष्ट्रात यापुढे राज्यमाता असणार आहे.समाज माध्यमांमध्ये या निर्णयानंतर 'गाय आई, तर वडील कोण...' या व अशा अनेक विनोदांचे पेव फुटले असले तरी या निर्णयाने खरोखरच राज्यातील गोवंशवृद्धी, संरक्षण किंवा संगोपन या दृष्टीने काय फरक पडणार आहे? 'गाय हा एक उपयुक्त पशू आहे...' या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या टोकाच्या तर्कशुद्ध भूमिकेपर्यंत सर्वांना जाणे शक्य नसले तरी गायीला 'राज्यमाता' न म्हणता बऱ्याच गोष्टी करण्याजोग्या आहेत. आता सरकार गोशाळांना प्रतिदिन प्रतिगोमाता ५० रुपये चारा-अनुदान देणार आहे; असे सांगितले जाते. हे खरे असेल तर गोवधबंदीमुळे आपल्याच गोठ्यात भाकड गायींना सांभाळणाऱ्या शेतकऱ्यांना येणाऱ्या खर्चाचा वाटा कोण उचलणार? अनेक शेतकरी सांगतात, की गाय भाकड झाली की पूर्वी तिला बाजारात २० ते २५ हजार रुपयांची किंमत मिळत असे. आता भाकड गाय चार ते पाच हजार रुपयांनाही विकली जात नाही.राज्यातल्या भाकड गायीही मारल्या जाऊ नयेत आणि त्यांचे त्यांच्या नैसर्गिक मृत्यूपर्यंत पालनपोषण व्हायचे असेल तर ही जबाबदारी प्रामुख्याने सरकार आणि गोसेवा करणाऱ्या स्वयंसेवी किंवा धार्मिक संस्थांनी घ्यायला हवी. हा बोजा शेतकऱ्यांवर पडता कामा नये. सरकारला गायींची इतकी काळजी असेल तर तिचे प्रतिबिंब आकडेवारीत पडायला हवे होते. प्रत्यक्षात महाराष्ट्रातील एकूणच गायींचे आणि त्यातही देशी वाणाच्या गायींचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे.पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गायीच्या दुधापासून पंचगव्यापर्यंत सर्व गोजन्य पदार्थांचे फायदे सांगितले आहेत. पण देशी वाणाच्या गायींची संख्या वाढतानाच त्या अधिकाधिक उत्पादक होऊन शेतकऱ्यांना लाभकारक कशा होतील, यासाठी सरकारने काहीच ठोस केलेले नाही. भाकड गाय असेल तरी तिच्यापासून मिळणारे शेण, गोमूत्र... यामुळे ती सांभाळणे आर्थिकदृष्ट्या फायद्याचे ठरते, असे दावे केले जातात. पण तसे प्रत्यक्षात शेतांवर आणि शेतकऱ्यांच्या गोठ्यात होते का? तसे होतच नसेल तर केवळ गायींना 'राज्यमाता' असा दर्जा देण्याने काय होणार?निवडणुकांच्या धामधुमीत आणि विजयाचे व्यूह रचण्याच्या भाऊगर्दीत किती बाष्कळ आणि वाह्यात निर्णय घेतले जातात, याचे दुसरे ठळक उदाहरणही राज्य सरकारने घालून दिले आहे. मुंबई ते पुणे या शहरांना जोडणाऱ्या विजेवरच्या शिवनेरी बससेवेच्या गाड्यांमध्ये आता 'शिवनेरी सुंदरी' असणार आहेत. मुळात हवाई सुंदरीऐवजी 'हवाई सेविका' असा शब्द आता प्रचलित होत असताना ही 'सुंदरी' आली कुठून? मुंबई ते पुणे या चार ते साडेचार तासांच्या प्रवासात प्रवाशांना अशी काय व किती मदत लागते की त्यासाठी एसटीने अशा नेमणुका कराव्यात? राज्य सरकारचा आणि एकूणच परिवहन खात्याचा भर हा राज्यातली एकूण एसटीसेवा कशी सुधारेल, एसटी स्थानके स्वच्छ कशी राहतील, तिथे प्रवाशांना स्वच्छ व स्वस्त अल्पोपहार कसा मिळेल, यावर नको का? राज्यातला गाड्यांचा ताफा जुना झाला आहे. मध्यंतरी छप्पर उडालेली एक एसटीची बस विदर्भात धावताना दिसली होती.एसटी स्थानकांवर आरोग्य सेवा किंवा महिला बचत गटांतर्फे खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्याची कल्पना चांगली आहे. मात्र, त्या आधी राज्यातली सर्व बस स्थानके सुरक्षित, किमान स्वच्छ व्हायला हवीत. अगदी मोठ्या शहरांमधली एसटीची स्वच्छतागृहेही आत पाऊल टाकण्याच्या लायकीची नसतात. मग तालुका व गावपातळीवरचे तर विचारायलाच नको. 'शिवनेरी' बससेवेत 'सुंदरी' देण्यापेक्षा या मूलभूत सोयी व सुविधांकडे एसटीने लक्ष देण्याची गरज होती. महामंडळाच्या नव्या अध्यक्षांना नवनव्या कल्पना सुचतात आणि त्या ते अमलात आणतात, हे खरे असले तरी प्राधान्य नेमके कशाला द्यायचे; याचा विवेक बाळगायला हरकत नसावी. राज्यभर विखुरलेल्या एसटी महामंडळाच्या आगार, स्थानके तसेच इतर जमिनींवर बरीच वर्षे अनेकांचा डोळा आहे.गेल्याच महिन्यात मंत्रिमंडळाने महानगरांमधील एसटीच्या ३९ स्थानके, आगारांचा व्यापारी तत्त्वावर विकास करण्याचे ठरविले. या आधी झालेल्या अशा विकासातून सरकारचा नेमका फायदा किती झाला आणि किती विकसकांनी ठरल्याप्रमाणे काम केले नाही; याचा लेखाजोखा लोकांसमोर ठेवणे, हे 'शिवनेरी सुंदरी' नेमण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. मात्र, सध्या सरकारला विजयाची आस लागली असून त्यामुळे वाट्टेल त्या निर्णयांचा बेबंद धडाका चालू आहे. राज्यमाता आणि तिच्या यजमानांनी याबाबत सरकारला माफ केले पाहिजे

# राज्यमाता आणि गोठ्यातले आपण

सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीतहा शाहू- फुले- आंबेडकर यांचा महाराष्ट्र यापुढच्या काळात शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांचा- अलीकडचा लोकप्रिय राजकीय शब्दप्रयोग करायचा तर- आभाळभर ऋणी राहील. या ऋणातून उतराई कसे व्हावे हे पुढच्या कित्येक पिढ्यांना कळणार नाही; इतके हे ऋण मोठे आहे. त्याचा संबंध या शंकराचार्यांनी आधी 'मातोश्री'वर पायधूळ झाडून, तेथील पाहुणचार झोडून, पोटभर आशीर्वाद देऊन नंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही तसेच आशीर्वाद दिले या त्यांच्या धार्मिक चातुर्याशी अजिबात नाही. असे सर्व डगरींवर एकाच वेळी पाय रोवून उभे राहता येणे यालाच अध्यात्म असे म्हणत असावेत. आणि असेही आत्मा एक आहे, असे म्हणतातच. तेव्हा 'मातोश्री'वर केलेली आशीर्वादवर्षा 'वर्षा'वासीयावरही केली तर कुठे बिघडते असाही स्थूलातून सूक्ष्मात जाणारा विचार शंकराचार्यांनी केला असणार. या ऋणाचा संबंध आपणास आणखी एक शंकराचार्य प्राप्त झाले, या आनंदवार्तेशीही नाही. पूर्वीच्या काळी या भारतवर्षात तीन आणि एक अर्धा इतकेच शंकराचार्य असत. हे अर्थातच पं. नेहरूंचे पाप. त्यांनी आयआयटी, आयआयएम, एम्स यांचा पुरेसा विस्तार केलाच नाही. त्यामुळे फक्त मूठभरांनाच त्याचा लाभ झाला. हे मूठभर त्यामुळे कायम पं. नेहरूंचा जप करीत बसतात. शंकराचार्यांबाबतही त्यांनी असाच हात आखडता घेतला असावा. काही का असेना, त्यातून त्यांचा हिंदुद्वेषच दिसून येतो. या देशाचा, हिंदूंचा आकार लक्षात घेता अधिकाधिक शंकराचार्यांची आपणास गरज होती. ती गेली दहा वर्षे यथासांग पूर्ण होताना दिसते. त्याचाच एक भाग म्हणून मोठ्या प्रमाणावर शंकराचार्य निर्मिती आपल्या देशात सुरू आहे. खरे तर 'एक जिल्हा, एक शंकराचार्य' अशी योजनाच हाती घ्यायला हवी. तसे झाल्यास हिंदूंचा उद्धार झालाच म्हणून समजा. तथापि तो होईपर्यंत सध्या उपलब्ध असलेल्या शंकराचार्यांवर आपणास भागवून घ्यावे लागेल. तूर्त त्यांनी आपणावर केलेल्या उपकारांविषयी.ते आहेत गोमातेस 'राज्यमाता' दर्जा देण्याच्या त्यांच्या सूचनेबद्दल. या राज्यातील नव्हे तर समग्र देश आणि खरे तर पृथ्वीवरील गोधन यामुळे खूश झाले असून त्यांच्या सुमधुर हंबरड्याने



आसमंत कसा भरून गेला आहे. यामुळे मेनका गांधींसह सर्वच प्राणीप्रेमींस आनंद अनावर झाला असून तो कसा व्यक्त करावा हे न कळून रस्त्यारस्त्यांवर कोणा गोप्रेमीने पुण्यसंचयासाठी भरवलेल्या फरसाण-गाठ्यांचा रवंथ करीत बसलेल्या, हाडे वर आलेल्या राज्यमातांचा शोध घेण्यासाठी झुंडीच्या झुंडी घराबाहेर पडल्या आहेत. गोमातेस 'राज्यमाता' जाहीर करा हा अत्यंत बुद्धिजन्य, पंडिती, प्रज्ञावान इत्यादी सल्ला निवडणुकेच्छू एकनाथरावांस साक्षात शंकराचार्यांनी दिला. धर्मरक्षक, धर्मप्रेमी आणि धर्मवीरांचे अनुयायी एकनाथराव हा शंकराचार्यांचा शब्द खाली कसा पडू देतील? त्यांनी ताबडतोब मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडला आणि त्यास नवे गोप्रतिपालक अजितदादा पवार यांनी त्वरेने अनुमोदन दिले. जुने गोप्रतिपालक देवेंद्र ऊर्फ देवाभाऊ यांनी हे श्रेय घेऊ नये यासाठी अजितदादांनी दाखवलेली चपळाई अगदी नोंद घ्यावी अशी. गोमातेचे प्रेमच असे आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा मुद्दा मंजूर होणे हा उपचार ठरला. लगेच सरकारी अध्यादेश निघाला. 'राज्यमाता' असे शिक्कामोर्तब गायीगायींवर झालेही. सुरुवातीस थोडा विलंब झाला तो 'राज्यमाता' की 'राजमाता' या शब्दच्छलाचा गुंता सुटेपर्यंत. अखेर 'राज्यमाता' हा शब्दप्रयोग उचित असल्याचे प्रमाणपत्र अलीकडचे वैय्याकरणी संजय शिरसाट आणि तत्समांनी दिल्यानंतर सरकारी आदेश प्रसृत झाला म्हणतात.आता लवकरच- बहुधा २४ तासांत- सरकारी आज्ञावलीही प्रसिद्ध होणार असून तीत 'राज्यमातेशी कसे वागावे' इत्यादी राजशिष्टाचारसंबंधी मुद्दे असतील. जसे की यापुढे रस्त्यावर फतकल मारून बसलेल्या राज्यमाता दिसल्यास वाहतुकीत व्यत्यय येत असल्याच्या कारणांसाठी राज्यमातांस उठवता येणार नाही. वाहतुकीने वाटल्यास राज्यमातेस वळसा घालून जावे अथवा तसेच वाहनांत बसून राहावे. शेतकऱ्यांस अथवा गोधन प्रतिपालकांस यापुढे दूध देत नाही, सरळ घरी येत नाही, रानोमाळ भटकते इत्यादी कारणांसाठी शेपटी पिरगाळता येणार नाही. राज्यमातेची शेपटी कशी काय पिळणार? निसर्गाच्या नियमानुसार या चतुष्पादाने खाल्लेल्या पदार्थांचे कोठेही उत्सर्जन झाले तरी त्यास यापुढे 'शेण' असे म्हणता येणार नाही. राज्यमातेच्या विष्ठेस शेण कसे म्हणणार? यावरून 'शेण खाल्ले' या अपमान निदर्शक शब्दप्रयोगासही कायमचे हद्दपार करण्याचा आदेश शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिल्याचे कळते. राज्यभरातील अशा राज्यमातांच्या वास्तव्यासाठी ठिकठिकाणच्या शाळा उपलब्ध करून द्याव्यात या केसरकर यांच्या मताची व्यवहार्यता तपासण्याचे काम सुरू आहे. ते झाले की या शाळांतून राज्यमातांच्या वास्तव्याची सोय होऊ शकेल. एरवीही या शाळांची अवस्था गोठ्यापेक्षा काही कमी नसल्याने तेथे राहण्याची संधी मिळाल्यास राज्यमातांस घरचे वातावरण अनुभवता येईल, हा यामागील विचार. आणि तसेही या शाळांत राहिले आहे काय? तेव्हा या पडक्या-झडक्या वास्तूंत राज्यमातांची सोय केल्यास काही पुण्य तरी सरकारच्या गाठीशी जमा होईल.या पाठोपाठ स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विज्ञानवादी वाङ्मयावर बंदी कशी आणता येईल याचेही प्रयत्न या संदर्भात सुरू करण्यात आले असल्याचे कळते. एकतर अलीकडच्या काळात विज्ञानवाद ही संकल्पनाच खरे तर कालबाह्य झालेली आहे. गावोगावी भरणारे सत्संग, नवनव्या बाबा- बापू- महाराजांचा उदय, त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लहानथोरांची झुंबड, सर्वोच्च सत्ताधीशांकडून या पुण्यपुरुषांना दिला जाणारा आश्रय इत्यादी पाहिले की विज्ञानवादाचा फोलपणा मठ्ठातील मठ्ठासही लक्षात येईल. असे असताना कोण सावरकर आणि कसले त्यांचे विज्ञानवादी विचार! त्यांच्याविषयी आदर व्यक्त करायला स्वातंत्र्यवीर ही उपाधी आणि 'ने मजसी ने' गायिले की झाले. कशास हवा त्यांचा विज्ञानवादी विचार? हे सावरकर गायीस केवळ 'उपयुक्त पशु' असे म्हणतात? 'राज्यमाते'चा किती हा अपमान? यवनही तो आता करू धजणार नाहीत. तेव्हा सावरकरांनी तो केला असेल म्हणून काय झाले? एकदा का राज्यमातेचा दर्जा मिळाला की तीस 'उपयुक्त पशु' ठरवणाऱ्या सावरकरांस विसरलेले बरे. 'राज्यमाते'च्या पुत्राविषयीही सावरकर असेच काही अद्वातद्वा बोलले आहेत. त्यामुळे त्यांच्या अशा वाङ्मयावर एकदा बंदी घातली की प्रश्न मिटला. महाराष्ट्र सरकारनेच बंदी घातली म्हटल्यावर राज्याबाहेर त्यांचे वाचणार कोण आणि कशाला? यथावकाश सगळ्यांच्या मनात 'राज्यमाता' घर करून बसतील यात शंका नाही.फक्त कोणी आता 'राज्यपिता कोण' हा प्रश्न तेवढा उपस्थित करू नये. प्रत्येक 'मातेस' एक भिन्नलिंगी साथीदार असल्याखेरीज तूर्त तरी प्रजोत्पादन होऊ शकत नाही, हे खरे असले तरी उभयतांतील 'संबंध' हे क्षणिक असतात असे साक्षात आचार्य अत्रे यांनीच सांगून ठेवलेले आहे. (पाहा : स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंत काळची माता असते.) तेव्हा राज्यपिता कोण हा प्रश्न अयोग्य. हे असले क्षुद्र मुद्दे विसरून आपण सर्व जण गायींस राज्यमातेचा दर्जा देण्याच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करू या आणि हा दर्जा देता यावा म्हणून या राज्याची अवस्था जणू गोठा अशी केली याबद्दल सरकारचे आभार मानू या.

# माहिती साक्षरतेची गरज

आपण पाणी, हवा, अन्न, धान्य, फळे, ध्वनी इ. प्रदूषणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आहे हे वाचत असतोच; तसेच यामुळे होणारे परिणाम सहनही करत असतो. परंतु जी माहिती आपण रोजच अनेक माध्यमांतून ग्रहण करीत असतो तीही प्रदूषित असते, मात्र त्यामुळे होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक परिणामांबाबत मात्र आपण अनभिज्ञ असतो किंवा माहीत असूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. इतर प्रदूषणांप्रमाणेच माहितीच्या प्रदूषणातही मानवी सहभाग आहेच. भेसळयुक्त पाणी, प्रदूषित हवा ओळखण्याचे तंत्र मानवानी शोधले आहे, परंतु प्रदूषित माहिती कशी ओळखायची? आपण अशी माहिती रोजच ग्रहण करीत असतो का? त्यामुळे आपले मानसिक व शारीरिक नुकसान कसे होते? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा हा एक प्रयत्न.आपण असे करतो का? एखादी बातमी किंवा लेखाचे फक्त शीर्षक वाचून त्याबाबतचे मत तयार करणे, मित्राला वाईट अनुभव आल्यामुळे एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जाण्याचे टाळणे, एखादी बातमी अर्धवट ऐकून तशीच दुसऱ्यांना सांगणे व वाद निर्माण करणे, शेजाऱ्यांबद्दल काही तरी ऐकणे आणि त्याची शहानिशा न करताच दुसऱ्यांना सांगणे, एखाद्या रोगावर सिद्ध न झालेल्या उपचाराबद्दल वाचणे आणि मित्रांना सांगणे, इ. इ. या सर्व उदाहरणांमध्ये माहितीची विश्वासार्हता ठाऊक नसताना, तिची शहानिशा न करताच तशीच इतरांना पाठवणे म्हणजेच माहिती प्रदूषित करणे. आजकाल विविध प्रकारच्या माहितीच्या स्त्रोतांतून जसे ई-मेल, इन्स्टंट मेसेजिंग, सोशल मीडिया - यांतून माहिती अक्षरश: आपल्यावर आदळत असते. फोन 'स्मार्ट' झाल्यापासून आणि त्याला वेगवान इंटरनेटची जोड मिळाल्यापासून असा एकही दिवस जात नाही, की आपण माहिती ग्रहण केली नाही. या माहितीचे प्रमाण इतके वाढले, की ग्रहण करण्याऱ्या युजर्सना माहितीचा ओव्हरडोस झाला. अशा प्रकारच्या माहितीच्या प्रदूषणावर जगभरात संशोधन चालू आहे. विशेषत: मानवी आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर सर्वच विद्याशाखांमध्ये अभ्यास केला जात आहे. त्यामुळे माहितीचा ओव्हरलोड, माहितीचा व्हायरस, माहिती विकार, माहिती युद्ध इ. नवीन शब्दावली अस्तित्वात आली आहे.




माहितीच्या प्रदूषणाचे दोन प्रकार आढळतात. हे प्रदूषण एक तर अनवधानाने केले जाते, किंवा जाणूनबुजून केले जाते. उदाहरणार्थ करोनाच्या काळात बरीचशी माहिती अनवधानाने पसरवली गेली. कधी कधी काही वर्तमानपत्रे, मासिके, दूरचित्रवाणी वाहिन्या बातम्या चुकीच्या शीर्षकाने प्रसिद्ध करतात. उदाहरणार्थ सन २०१९मध्ये प्रिन्स्टन विद्यापीठातील संशोधकांनी प्राण्यांवर साखरेचे प्रयोग करून काही निष्कर्ष काढले. अमेरिकेतील एका नामवंत वृत्तपत्राने ही बातमी 'साखर हे कोकेनप्रमाणे व्यसन आहे' अशा शीर्षकाखाली प्रसिद्ध केली. अशी बातमी साखर खाणाऱ्यांसाठी धक्कादायक ठरू शकते. बातमी संपूर्ण वाचल्यानंतर नेमके काय, याचा उलगडा होतो. इंटरनेटवरील काही संकेतस्थळे व्यंगात्मक असतात. उदा. अमेरिकेतील ढहश जपळेप. काही लोक अशा संकेतस्थळावरील लेख गांभीर्याने घेतात. काही वेळा दोन संकेतस्थळे इतकी सारखी दिसतात, की त्यातील विश्वासार्ह कोणते हे ओळखणे अवघड होते. त्यामुळे देखील माहितीच्या प्रदूषणात भर पडते.दुसऱ्या प्रकारात मात्र हेतुपुरस्सर काही उद्देश ठेऊन - जसे पैसे कमविणे, राजकीय फायद्यासाठी, त्रास देण्यासाठी - माहिती तयार करून पसरवली जाते. अशी विडंबनात्मक, दिशाभूल करणारी, नकली फेरफार केलेली माहिती मानवी जीवनास हानी पोहोचवणारी असते. उदाहरणार्थ नोकरीच्या बनावट जाहिराती, फसव्या गुंतवणूक योजना, कोटा प्रवेशासाठी तयार केलेली बनावट वैद्यकीय शैक्षणिक प्रमाणपत्रे, बनावट आर्थिक माहिती, घर खरेदीदारांना दिलेली लेखी खोटी आश्वासने, उत्पादनांच्या खोट्या जाहिराती (खरेदी केल्यानंतर समज देणाऱ्या) इ. अशा भूलथापांना अनेक लोक बळी पडून पैसा आणि वेळ वाया घालवतात. चूक लक्षात आल्यानंतर होणारा मनस्ताप आणि त्यामुळे होणारा शारीरिक त्रास वेगळाच. करोनाच्या काळात आरोग्याविषयी विश्वासार्ह माहिती स्रोतांमध्ये तोतयेगिरी करून जाणूनबुजून चुकीची माहिती पसरवली गेली. सॅनिटायझर वापरल्याने आणि मीठ घातलेले गरम पाणी प्यायल्याने करोना जातो, हे त्यातील एक उदाहरण. अशा अनेक आरोग्यटिपा पसरवल्या गेल्या. त्यातून या उपायांचा अतिरेक केल्याने आरोग्याचे इतर त्रास सुरू झाले.माहिती प्रदूषणाचे अनेक गंभीर परिणाम भोगावे लागतात. करोनासारख्या साथींच्या काळात रोगावरील लशीबद्दल कोणत्याही विश्वासार्ह माहितीच्या आधाराशिवाय चुकीची माहिती पसरवली गेली तर ती लसीकरण दर कमी करते; ज्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढतो. गंभीर आजारांवर (उदा. कर्करोग, मधुमेह) उपचार म्हणून केलेल्या खोट्या जाहिराती वाचून केलेले उपचार रुग्णांसाठी धोकादायक ठरतात. नैसर्गिक संसाधनांच्या उपलब्धतेबद्दल किंवा सुरक्षिततेबद्दल दिशाभूल करणारी माहिती (उदा. पाणी, अन्न) चुकीचे निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकते, ज्यामुळे टंचाई किंवा अति-शोषण होऊ शकते. इंटरनेटवरील माहितीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर चाच्यांनी अनेक लोकांना लाखो रुपयाचा गंडा घातलेल्या बातम्या आपण रोजच वाचतो. आर्थिक घोटाळे, त्वरित श्रीमंत होण्याच्या योजना, किंवा दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमुळे व्यक्ती आपली जमापुंजी गमावू शकतात. उत्पादनाचे खोटे दावे किंवा कंपन्यांबद्दल चुकीची माहिती ही खरेदीच्या निर्णयांवर प्रभाव टाकतात. त्यामुळे पैसे वाया जातात, तसेच उत्पादनांचा असुरक्षित वापर त्यातून होऊ शकतो.दिशाभूल करणारी माहिती लोकांमध्ये भीती, तणाव, गोंधळ आणि अविश्वास निर्माण करते. आत्मविश्वासाची कमतरता होऊ शकते. अशा परिस्थितीत योग्य निर्णय घेणे कठीण होते आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. माहितीच्या प्रदूषणापासून वाचण्यासाठी प्रत्येकाने योग्य खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. माहिती वापरण्यापूर्वी माहिती स्त्रोताचा लेखक, तारीख, संदर्भ तपासणे, लेखाचा अर्थ जाणून घेणे, स्वतःचे पूर्वाग्रह तपासणे, तसेच तज्ज्ञांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. काही संकेतस्थळे माहितीचे प्रदूषण ओळखण्यासाठी तयार केली आहेत उदा.प्रत्येकाने माहितीसाक्षर असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे माहितीची विश्वासार्हता आणि उपयुक्तता तपासून लोक वैयक्तिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक परिस्थितीत चांगले निर्णय घेऊ शकतात. माहितीसाक्षरता ही माहितीचा तर्कशुद्धपणे विचार करण्यास प्रोत्साहन देते, तसेच तथ्य, मते आणि चुकीची माहिती यांत फरक ओळखण्यास मदत करते. माहिती साक्षरव्यक्ती स्वतंत्रपणे माहिती शोधण्याचे आणि वापरण्याचे कौशल्य आत्मसात करू शकते. अशा व्यक्तीची समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता वाढते. माहितीचा जबाबदारीने वापर, साहित्यिक चोरी, कॉपीराइट कायदे आणि विश्वासार्ह माहिती स्त्रोतांचे मूल्यांकन करणे हे सर्व माहितीच्या साक्षरतेमुळे समजते.लोकशाहीला खऱ्या अर्थाने बळकट करण्यासाठी माहिती साक्षरता अनिवार्य आहे. जर प्रत्येक नागरिकाने माहितीचे प्रदूषण थांबवण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेतला, तरच योग्य आणि विश्वासार्ह माहितीचा प्रवाह कायम राहील. चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीच्या निर्मूलनाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली तरच आपला समाज आणि आपली लोकशाही प्रगल्भ, सजग आणि प्रभावी होऊ शकतील

# सागर तळातील 'डार्क ऑक्सिजन'

खोल समुद्रतळाशी १२ हजार फूट (३९६२ मीटर) आणि त्याहून अधिक खोलीवर काही धातूखनिजे रासायनिक प्रक्रियेद्वारे ऑक्सिजननिर्मिती करतात, हे अलीकडील संशोधनातून सिद्ध झाले आहे. त्याला 'डार्क ऑक्सिजन' म्हणतात. समुद्रात १२ हजार फूटांहून अधिक खोलीवर सूर्यप्रकाश पोहोचू शकत नाही आणि त्यामुळे खोल (बीसल) सागरतळात अंधाराचे साम्राज्य असते. त्यामुळे तिथे प्रकाशसंश्लेषण (फोटोसिंथेसीस) न झाल्याने वनस्पती ऑक्सिजन निर्माण करू शकत नाहीत. परंतु तरीही खोल समुद्री जीवांना ऑक्सिजनचा पुरवठा कुठून होतो, हे एक मोठे कोडे होते!समुद्राच्या पाण्याच्या एका अणूचे विभाजन करण्यासाठी १.५ व्होल्ट इतक्या विद्युत शक्तीची आवश्यकता असते. खोल समुद्रतळातील सपाटीवर मुबलक प्रमाणात असलेले बहुधातू गोटे किंवा गट्टे (पॉली मेटॅलिक नोड्यूल्स) हे प्रत्येकी ०.९५ व्होल्ट एवढी विद्युतनिर्मिती करतात. असे मोठ्या समूहातील गोटे (नोड्यूल्स) एकत्रितपणे बरीच अधिक विद्युतनिर्मिती करतात, असे सिद्ध झाले आहे. गोट्यांमधील या विद्युत ऊर्जेमुळे समुद्री पाण्याचे इलेक्ट्रालिसीस ही रासायनिक प्रक्रिया घडते, त्यातून सागरी पाण्याच्या अणूचे विभाजन होऊन त्यातून ऑक्सिजननिर्मिती होते आणि हा ऑक्सिजन सागरी जिवांना जगवतो. खोल समुद्रात असलेल्या बहुधातू गोट्यांमध्ये असलेल्या विविध धातूंमुळे वीजनिर्मिती होते, त्यामुळे या गोट्यांना समुद्री बॅटरीज म्हणता येईल.या गोट्यांमध्ये (नोड्यूल) असलेली विविध दुर्मिळ धातूखनिजे हल्ली विद्युत वाहने आणि इतर बॅटरीच्या निर्मितीसाठी तसेच इतर अनेक उद्योगांत वापरली जातात. त्यामुळे हे गोटे समुद्रातून बाहेर काढण्याचे काम हल्ली वेगाने होत आहे. परंतु, यामध्ये एक धोका संभवतो. समुद्रतळातील हे बहुधातू गोटे नष्ट झाल्यावर तिथे ऑक्सिजन निर्मिती होणार नाही आणि सागरी जीवनापुढे अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहील, अशी भीती आहे. त्यामुळे जगातील अनेक पर्यावरणवादी संस्था अशा प्रकारच्या सागरी खाणकामाला विरोध करत आहेत. (उत्तरार्ध)

# सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून युवती, महिलांना महिला सुरक्षा ॲप मोफत भेट – निखिल वारे

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महिला व बालकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा आपल्या सर्वांच्या चिंतेचा विषय आणि संवदेनशील बनला आहे. आपल्या घरातील तसेच परिसरातील मुली, महिला सुरक्षित राहणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. या भावनेतून या प्रयत्नांचा एक भाग म्हणून आज माझ्या संकल्पनेतून लाडक्या बहिणी व जेष्ठ नागरिकांसाठी निडली सॉस हे अत्यंत प्रभावी असे मोबाइल ॲप्लिकेशन सावेडी उपनगरातील महिला, जेष्ठ नागरिक व लेडीज हॉस्टेल मधील मुली यांना मोफत उपलब्ध करून दिले आहे. हे मोबाईल ॲप वापरण्यासाठी अत्यंत सोपे असून इतर अप्लिकेशन सारखे त्याचा वापर महिला मुली सहज करून स्वतःला सुरक्षित ठेऊ शकतील असे प्रतिपादन माजी नगरसेवक निखिल वारे यांनी केले.

सावेडी उपनगरात नीडली सॉस या प्लीकेशन चे उद्घाटन श्री. निखिल वारे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी साई टेक्नो सर्विसेस चे अजित



रोकडे, उपनगरातील युवती, महिला, नागरिक उपस्थित होते.श्री. वारे पुढे म्हणाले

ज्या वेळेस मुली, महिला यांना असुरक्षिततेची भावना तयार होईल किंवा कुठल्याही संकटाची जाणीव झाली तर मोबाइल मधील निडली सॉस या ॲप चा वापर केल्यास त्वरित जवळच्या चार नातेवाईक किंवा वरिष्ठ यांना सदर महिला असुरक्षित असल्याबाबतचा डचड आपोआप पाठविला जातो तसेच सदर मुलीचे लाईव्ह लोकेशन सुद्धा जाते आणि ते लोकेशन ट्रॅक करून त्या संकटग्रस्त मुली पर्यंत पोहोचता येते. तसेच तिच्या मोबाइल मध्ये आपत्कालीन सायरन वाजू लागतो, त्यामुळे समोरील व्यक्तीला गोंधळात पाडता येते. तसेच मोबाइल प्लिकेशन मधून आजूबाजूचा व्हिडिओ रेकॉर्ड करता येणे शक्य होते. त्याचबरोबर सदर ॲपचा वापर करून सुरक्षेसाठी उपलब्ध असणाऱ्या शासनाच्या विविध हेल्पलाईनलाही संपर्क करणे शक्य होते. सदर सुविधा ही माझ्या कडून मोफत पुरविल्या जाणार असल्याचे सांगितले. अधिक माहिती देताना निखिल वारे म्हणाले विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना सुरू करून महिला सक्षमीकरणाचे पाऊल उचलले या लाडक्या बहिणींची सुरक्षितेबरोबरच अहिल्यानगरच्या युवती, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी देखील सुरक्षित राहावे या उद्देशाने अभिनव आयटी सोल्युशन पुणे आणि नगरचे साई टेक्नो सर्विसेस यांच्या माध्यमातून निडली सॉस हे उपयुक्त असे प बनविण्यात आले आहे यामुळे सर्वांची सुरक्षितता राहण्यासाठी हे प काम करते हे प मोफत देण्यात आले असून लाडकी बहीण सुरक्षित बहीण ते ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे श्री.वारे म्हणाले यासाठी मला मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील, मा. आमदार संग्रामभैय्या जगताप आणि माजी खासदार सुजयदादा विखे पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. असे त्यांनी सांगितले. या वेळी उपस्थित युवतींनी या उपक्रमाचे स्वागत करून नेहमीच नागरिकांच्या मदतीला धावणारे आणि उपनगरात अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देणारे निखिल वारे यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

## क.जे.सोमैया मध्ये भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

हिंद सेवा मंडळाच्या क .जे . सोमैया हायस्कूल मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला . या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे दैनिक सार्वमत उपसंपादक अशोक गाडेकर, शभुक विद्यार्थी वसतीगृह अधिक्षक अशोक दिवे, प्रसिद्ध उद्योजक सामाजिक कार्यकर्ते कैलास खंदारे, शालेय समिती सदस्य चंदकांत कर्नावट, किशोर फुणगे, विघालयाच्या माजी जेष्ठ शिक्षिका श्रीमती शशी लोळगे, सेवक प्रतिनिधी कल्याण लकडे, मुख्याध्यापक भूषण गोपाळे उपस्थित होते . प्रमुख मान्यवरांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या



प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती आपल्या भाषणातून व्यक्त केली . शंभुक वसतीगृहाचे अधिक्षक यांनी आपले मनोगतात कामगार, महिला, वंचित उपेक्षितच शैक्षणिक आदि सेवा क्षेत्रात डॉ. बाबासाहेबांच्या महान कार्याची माहिती विशद केली . कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक गाडेकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष सोले यांनी केले . सुत्रसंचालन रुपाली केवल यांनी केले . आभार अनिल चोभे यांनी मानले . कार्यक्रमास सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

## ई व्ही एम हटाव;देश बचावच्या स्वाक्षरी अभियानास शेवगाव शहरात उस्फुर्तपणे प्रतिसाद

**शेवगाव । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीयअध्यक्ष ॲड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व मतदार संघात ईव्हीएम विरोधात मतदारांची स्वाक्षरी मोहीम दि ३ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे

या अनुषंगाने आज शेवगाव येथे शहर व तालुक्यातील अनेक स्वाभिमानी मतदारांनी ईव्हीएम विरोधात स्वाक्षरी मोहीमेत उपस्थिति दर्शवली शेवगाव शहरातील क्रांती चौक येथे वंचित बहुजन आघाडीचे राज्य महासचिव प्रा किसन चव्हाण यांनी प्रथम स्वाक्षरी करून तालुक्यातील स्वाक्षरी अभियानास सुरुवात झाली शेवगाव तालुका अध्यक्ष शेख प्यारेलालभाई यांच्या मार्गदर्शनाखाली स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली आहे

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष




प्रा किसन चव्हाण व शेख प्यारेलालभाई यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या यावेळी अरुण पाटील झांबरे, ऑगस्टीन गजभीव, लक्ष्मण मोरे, शेख सलीम जिलाणी, गणेश बोरुडे, संभाजी कुसळकर,भिमा गायकवाड, सुरेश खंडागळे, नितीन गुंजाळ, पप्पू गर्जे, संजय चव्हाण, ज्ञानेश्वर पिटेकर, सुंदर आल्हाट व ईतर सामाजिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पोलीस व राजकीय नेत्यांना धमकी देणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर: शहराच्या कोतवाली पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्यासह इतर कर्मचारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन करून शिवीगाळ केल्याची व प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेत्यांना बॉम्बस्फोट करून उडवून देण्याची धमकी दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी भाऊसाहेब नारायण शिंदे (रा. चिचोंडी पाटील, ता. अहिल्यानगर) याच्याविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाऊसाहेब शिंदेने कोतवाली पोलीस ठाण्यात फोन करून महिला कर्मचारी व एका पुरुष कर्मचाऱ्याला शिवीगाळ केली तसेच पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी व विविध वरीष्ठ पोलिस अधिकारी, राजकीय नेत्यांची नावे घेऊन त्याने शिवीगाळ केली. प्रशासकीय अधिकारी व राजकीय नेत्यांना बॉम्बस्फोट करून उडवून




देईल, अशी धमकीही त्याने दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, शिंदे याला कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याला पोलिसी खाक्या दाखवला.

## मोफत प्लास्टीक सर्जरी शिबीराचे उद्घाटन संपन्न

**शिर्डी । प्रतिनिधी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व डॉ.राम चिलगर गीव्ह मी फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांचे संयुक्त विद्यमाने दि.०६ डिसेंबर २०२४ ते दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात (२०० रुम ) येथे प्लास्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेत आलेले आहे. सदरील शिबीराचा उद्घाटन समारंभ श्री साईबाबा संस्थानचे प्र.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, संदिप कुमार भोसले यांचे अध्यक्षतेखाली आज दि. ०६ डिसेंबर २०२४ रोजी पार पडला. सदर शिबीराचे वेळी बोलताना प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रुग्णालयातील डॉक्टर्स , नर्सिग स्टाफ व इतर




कर्मचारी यांच्या सेवाभाव वृत्तीमुळे येथे होणारे सर्व शिबीरे यशस्वी होवुन त्याचा गरीब व गरजु रुग्णांना मोठा फायदा होत असुन यातुन श्री साईबाबांच्या रुग्ण सेवा हिच ईश्वरसेवा या शिकवणीचा प्रत्यय येथील वातावरणातुन नेहमी येत असलेबाबत सांगीतले.

यावेळी गीव्ह मी फाउंडेशन चे डॉ.राम चिलगर, डॉ.सुजित खोडे, डॉ.स्वाती पांडे प्र.वैद्यकीय संचालक, डॉ.प्रितम वडगावे, प्र.वैद्यकीय अधिक्षक डॉ.मैथिली पितांबरे, डॉ.राम नाईक, डॉ.विद्या बो-हाडे, डॉ.रेवन येंगे, डॉ.गोविंद कलाटे, डॉ.मृणाली गोंदकर, डॉ.प्राजक्ता बनकर, जनसंपर्क अधिकारी, सुरेश टोलमारे, प्र.अधिसेविका, नजमा सय्यद यांचे सह रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थीत होते. शिबीर यशस्वी व्हावे याकरीता सर्व ओटी/वार्ड इन्चार्ज, नर्सिंग स्टाफ यासंह कर्मचारी प्रयत्नशील आहेत. कार्यक्रमाचे प्रस्तावीक, डॉ.मैथिली पितांबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सुरेश टोलमारे यांनी मानल

## पाथर्डीतील मृतदेहाची घटना नातेवाईकांनी दाखल केले होते मिसिंग रिपोर्ट

**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी : पाथर्डी तालुक्यातील खेर्डा फाटा येथील सुशील लुणावत यांच्या शेतात एक मृतदेह आढळला आहे. मृत व्यक्तीची ओळख मिठू भाई भिकण भाई शेख, निवासी नवीपेठ, पाथर्डी अशी करण्यात आली आहे.



मिठू भाई शेख हे २५नोव्हेंबर २०२४ रोजी बेपत्ता झाले होते, त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात मिसिंग रिपोर्ट दाखल केला होता. काही आठवड्यांनंतर, आज सकाळी ०७:०० वाजता खेर्डा फाटा येथील शेतात त्यांच्या मृतदेहाची कुजलेली स्थिती आढळली.

पाथर्डी पोलीस दलाने घटनास्थळी त्वरित पोहोचून तपास सुरू केला. मृतदेह सिव्हील हॉस्पिटल, पाथर्डी येथे शवविच्छेदनासाठी पाठवला गेला आहे. घटनास्थळी पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असून, मृत्यूचे कारण शोधण्यासाठी अधिक तपास केला जात आहे.

पोलिस उपनिरीक्षक आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेची सखोल तपासणी केली जात आहे. पाथर्डी पोलीस निरीक्षक मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली तपासाची कार्यवाही सुरू आहे.

मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांकडून अधिक माहिती घेण्यात येत असून, साक्षीदारांचीही चौकशी केली जात आहे. पोलिसांचा संशय आहे की, मृत्यू अपघाती आहे की अन्य कोणत्या कारणामुळे झाला हे अजून अस्पष्ट आहे.

पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३चे कलम १९४ प्रमाणे आ.मृ रजिस्ट्री दाखल केली आहे. पोलिसांनी या प्रकरणावर अधिक तपास सुरू ठेवला आहे आणि मृत्यूच्या कारणाचा उलगडा लवकरच होईल, अशी आशा व्यक्त केली आहे

## आमदार पंकज भोयर यांनी विधानसभेत दिला 'जय श्रीराम जय शिवराय'चा नारा

**वर्धा । प्रतिनिधी**

राजकारणात पुरोगामी प्रतिमा ठरवण्याची स्पर्धा वाढलेली असताना, वर्धेचे आमदार डॉ. पंकज भोयर यांनी विधानसभेत शपथ घेतल्यानंतर 'जय श्रीराम जय शिवराय'चा नारा देऊन एक वेगळाच संदेश दिला आहे. ७ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी विधानसभेत शपथ घेतली, त्यानंतर त्यांनी हे उद्घोष केले, ज्यामुळे त्यांच्या हिंदुत्ववादी भूमिकेला प्रगल्भता प्राप्त झाली आहे.

वर्धा जिल्ह्यात महायुतीत भाजपाने चारही विधानसभा मतदारसंघांमध्ये विजय मिळवला असून, या विजयाच्या पार्श्वभूमीवर डॉ. पंकज भोयर यांनी



आपल्या प्रचारात 'जय श्रीराम'चा नारा दिला होता. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारातही त्यांच्या भाषणाची सुरूवात 'जय श्रीराम'च्या उद्घोषाने झाली होती.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात वर्धेतील राम मंदिरात दर्शन घेऊन त्यांनी प्रचार केला आणि निकाल लागल्यानंतर विजयी मिरवणूक राम मंदिरात नेली होती. आजच्या शपथविधीच्या वेळी, डॉ. पंकज भोयर यांनी संविधानाने दिलेल्या अधिकारांचे पालन करण्याची शपथ घेतल्यानंतर 'जय श्रीराम जय शिवराय'च्या उद्घोषाने आपली भूमिका स्पष्ट केली, ज्यामुळे राम आणि शिवराय भक्तांकडून त्यांचे स्वागत करण्यात आले.

## किशोरवयीन मुलांसाठी मार्गदर्शन शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

किशोरवयीन मुलांमध्ये होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बदलांवर लक्ष केंद्रित करत, विद्या विकास हायस्कूल हिंगणघाट येथे सखी सावित्री समिती व इनर्विल क्लब हिंगणघाट यांच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. नयना तुळसकर होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रणाली सायंकर आणि इनर्विल क्लबच्या अध्यक्षा डॉ. रुपल कोठारी उपस्थित होत्या.डॉ. प्रणाली सायंकर यांनी आपल्या भाषणातून किशोरवयीन मुलांच्या लैंगिक शिक्षणाविषयी स्पष्ट मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या वैद्यकीय अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना अवेळी येणाऱ्या संकटांपासून सावध राहण्याचे महत्त्व सांगितले. डॉ. रेखा नानवटकर यांनी एड्स आणि क्षयत मधील महत्त्वाचे फरक समजावून सांगत विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जागरुकतेवर भर दिला.डॉ. नयना तुळसकर यांनी विद्यार्थ्यांच्या आहार, व्यायाम आणि स्वच्छतेच्या सवयींबद्दल मार्गदर्शन करत आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले.पंचायत समितीच्या संगीता पेठे यांनी विद्यार्थी सुरक्षेसाठी महत्त्वाचे कायदे व आवश्यक फोन नंबर याबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मुख्याध्यापक नितेश रोडे यांच्यासह शिक्षकवर्ग आणि कर्मचारी, यामध्ये गोल्हर, कोळसे, मानकर, तेलंग, सिडामे, टिपले, परबत, पुसदेकर ,नाल्हे, खांदनकर, अमोल तिखट व शिल्पा शिवणकर यांचा मोलाचा वाटा होता.कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसोबत पालकांचा देखील मोठा प्रतिसाद लाभला.



## लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी ही केवळ अफवा

# अर्थसंकल्पापर्यंत लाभ मिळत राहणार; त्यानंतर २१०० रुपये देणार, आदिती तटकरेंचा दावा



**मुंबई (वृत्तसंस्था)**

लाडकी बहिण योजनेच्या अर्जाची छाननी करण्याचा कोणताही निर्णय झालेला नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. मी या खात्याची मंत्री असेपर्यंत असा कोणताही निर्णय झाला नसल्याचे त्या म्हणाल्या. तशा काही तक्रारी आल्या तर सरकार पुढील निर्णय घेईल. पण अद्याप तशा तक्रारी दाखल झालेल्या नसल्याचा दावा देखील तटकरे यांनी केला आहे.
लाडकी बहीण योजनेच्या अर्जाची छाननी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांच्याकडून केला जात आहे. मात्र यावर आदिती तटकरे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. लाडकी बहिण योजनेचा जीआर काढला त्यावेळी त्यात काही नियम दिले गेले होते. त्या नियमानुसारच सर्व महिलांना योजनेचा लाभ देण्यात आला असल्याचा दावा आदिती तटकरे यांनी केला आहे. सर्व निकषांमध्ये बसणाऱ्या महिलांनाच लाडकी बहिण योजनेचे पैसे देण्यात आले असल्याचा दावा देखील त्यांनी केला.लाडक्या बहिणी संदर्भात नियम बदलले जाणार असल्याच्या अफवा पसरवल्या जात असल्याचे देखील तटकरे यांनी म्हटले आहे. एका घरातल्या केवळ दोन महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ दिला जाईल, अशा प्रकारचा कोणताच नियम नसल्याचे देखील तटकरे यांनी म्हटले आहे. राज्यांमध्ये अडीच कोटी पर्यंत लाभार्थी असू शकतात, असे आम्ही सुरुवातीपासून म्हटले होते. सध्या दोन कोटी ३४ लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत असल्याचा दावा तटकरे यांनी केला आहे. त्यामुळे आपण त्या आकड्याच्या जवळपासच असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे.पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांना २१०० रुपयांचा लाभ देण्याचे महायुतीने कबूल केलेले आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याची घोषणा करणार असल्याचे देखील तटकरे यांनी सांगितले आहे. सध्या ज्या महिलांना लाभ मिळत आहे, तो पढील अर्थसंकल्पापर्यंत तसाच मिळत राहणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.

# श्री दत्त महाराजांच्या जयंतीनिमित्त समर्थ मठात नामसप्ताह सुरवात

## आज स्वामी समर्थ मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नांदूरशिंगोटे नाशिक-पुणे महामार्गावरील सिन्नर तालुक्यातील नांदूरशिंगोटे शिवारात असणाऱ्या श्री अनंतकोटी, ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ मठात दत्त महाराजांच्या जयंतीनिमित्त (दि. ८) पासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नाम सप्ताहात दररोज कीर्तन, नाम, जप तसेच होमहवन आदी कार्यक्रम सोमवार (दि. १६) पर्यंत होणार असून यावेळी सामुदायिक गुरुचरित्र वाचनाचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती मठाचे मठाधिपती प्रदीपदादा सोनवणे यांनी दिली आहे.




यावेळी दररोज सकाळी भुपाळी आरती, नैवेद्य आरती तसेच नित्य स्वाहाकार, गणेश याग, चंडीयाग, स्वामीयाग, गिताई याग, रुद्र याग, १० डिसेंबर रोजी मूर्तीची मिरवणूक श्री अनंतकोटी, ब्रम्हांडनायक मठात दत्त जयंतीचे औचित्य साधून स्वामी समर्थ महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. मंगळवार दि. १० रोजी समर्थ महाराज यांच्या मूर्तीची भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. गुरुवार दि. १२ रोजी महामंडलेश्वर शिवगिरी महाराज यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. दि. १५ रोजी दत्त जयंती निमित्त सकाळी आठ वाजता दत्त महाराज पालखी मिरवणूक व त्यानंतर दुपारी १२ : ३९ वा. दत्त जन्मोत्सव भाविक व सेवेकरी यांच्या उपस्थितीत साजरा केला जाणार आहे,पालखी मिरवणूक, सत्यदत्त पूजन आदी कार्यक्रम होणार आहे. यावेळी दररोज रात्री सातला हभप. बाल कीर्तनकार समर्थ महाराज ठाकरे, हभप. पल्लवीताई वाकचौरे, हभप. पूजाताई कानवडे, हभप. जयश्रीताई गावंडे, हभप. सुनील महाराज मंगळापुरकर, हभप. शिवशाहीर शरद महाराज ढवळे, हभप. अनंत महाराज काळे, हभप. केशव महाराज खरात यांची कीर्तन सेवा होईल. सोमवार दि. १६ रोजी सकाळी दहा वाजता संजय महाराज वेळूकर, सातारा यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. मठात सात दिवस श्रीगुरुचरित्र ग्रंथाचे पारायण होणार आहे.

# महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या राज्य अध्यक्षपदी नगरचे संजयकुमार निक्रड यांची नियुक्ती

## माध्यमिक शिक्षक सोसायटीत सत्कार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाच्या राज्य अध्यक्षपदी केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे गणित शिक्षक संजयकुमार हरिश्चंद्र निक्रड यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीबद्दल माध्यमिक शिक्षक सोसायटीत निक्रड यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र गणित अध्यापक महामंडळाचे राज्य प्रकाशन समिती प्रमुख नवनाथ घुले, जिल्हा गणित मंडळाचे सल्लागार कल्याण ठोंबरे, जिल्हा मंडळाचे परीक्षा प्रमुख विष्णू मगर, जिल्हामंडळ सदस्य अविनाश बोंद्रे, प्रख्यात व्यावसायिक नंदेश शिंदे, तुषार चोरडिया आदींसह अहमदनगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे सर्व कार्यकारिणी सदस्य व अध्यापक उपस्थित होते.



राज्य गणित महामंडळाच्या ४७ वर्षात नगर जिल्ह्याला अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. राज्य महामंडळ हे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात प्रभावीपणे कार्यरत आहे. ही महाराष्ट्रातील गणित शिक्षकांची संघटना असून, ती प्राविण्य प्रज्ञा परीक्षा व त्या परीक्षा संबंधीची मार्गदर्शक पुस्तके महाराष्ट्रातील बहूसंख्य शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवत असतात. संजयकुमार निक्रड यांच्या निवडीने जिल्ह्यातील सर्व गणित अध्यापकाची मान उंचावली असल्याची भावना नवनाथ घुले यांनी व्यक्त केली.निक्रड यांच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात राज्य महामंडळ सर्वोत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास जिल्ह्यातील गणित अध्यापकांनी व्यक्त केला आहे. निक्रड हे सध्या नगर जिल्ह्याचे गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष असून, त्यांना राज्य कमिटीवर अध्यक्ष म्हणून संधी देण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळाचे सल्लागार विलास आंबोळे, मच्छिंद्र वीर, जर्नाधन मुंडे, नाना लामखेडे, सिध्देश्वर मुंबरे, विठ्ठल शिंदे आदींसह जिल्ह्यातील गणित अध्यापकांनी अभिनंदन केले आहे.

## स्वस्त धान्य दुकानातुन निकृष्ट धान्य वाटप व मनमानी कारभार विरोधात

# तहसीलदारांना स्वस्त धान्य दुकानातील तांदळाच्या खिचडीचे वाटप लक्ष्यवेधी आंदोलन-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

देशात गोरगरीबांसाठी, दुर्बल घटकांसाठी शासनामार्फत अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत, अंत्योदय अन्न योजना आदिच्या माध्यमातून राशनकार्ड धारकांना मोफत धान्य वाटप करण्यात येते.परंतु अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानदारच लाभार्थ्यांच्या रेशनवर डल्ला मारतो.राशन देताना काटा मारणे, धान्य कमी मोजुन देणे तर काही लाभार्थ्यांना धान्य संपल्याची थाप मारून बोळवण केली जाते. स्वस्त धान्य दुकानदारांकडून रेशनच्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असुन काळ्या बाजारातुन धान्याची खरेदी विक्री होत असल्याच्या घटना आढळून येतात.बीड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार दारांकडुन रेशनकार्ड धारकांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत.रेशनवर नियंत्रण ठेवणाऱ्या या दक्षता समित्या कागदोपत्रीच असुन सामान्य लोकांच्या हक्काचे उल्लंघन आणि स्वस्त धान्य दुकानदारांकडुन रेशनच्या धान्याची काळ्या बाजारात खरेदी विक्री आणि रेशनकार्ड धारकांनी विचारणा केल्यास अरेरावी आदी प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांचे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०९ सोमवार रोजी सकाळी बीड तहसिल कार्यालयाच्या आवारात दगडाच्या चुलीवर स्वस्त धान्य दुकानातुन वाटप झालेल्या निकृष्ट दर्जाच्या तांदळाची खिचडी शिजवून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या समोर ठेवून ग्रामस्थांनी निकृष्ट धान्य वाटप आणि स्वस्त धान्य दुकानदार यांच्या मनमानी कारभाराच्या समस्या मांडल्या.प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन





करण्यात आले. निवेदन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन,शेख मुस्ताक, बप्पासाहेब पवार, अंकुश परीहार,अर्जुन ससाणे,सुमन ससाणे,दैवशाला ससाणे, सुभाबाई ससाणे,बाळु साबळे, नवनाथ घोलप,शेख नदीम शेख करीम, बापुराव येडे, ईश्वर चव्हाण आदी सहभागी होते.
रेशन दुकानाचा कारभार पारदर्शक व्हावा, नागरीकांना धान्य पुरवठ्यात काही अडचण येऊ नये यासाठी प्रत्येक रेशन दुकानासाठी दक्षता समिती स्थापन करण्यात येते. ग्रामपातळीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत रेशन दुकानातुन वितरीत करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तुंवर देखरेख ठेवण्यासाठी अध्यक्ष, सचिव, सदस्य अशी १२ अशासकीय पदे असलेल्या दक्षता समितीची स्थापना करणे बंधनकारक आहे.अशासकीय समित्यांवर सरपंच अध्यक्ष, तलाठी सचिव तर सदस्यांमध्ये विविध कार्यकारी सोसायटी,३ महिला,विरोधी पक्षाचे २ सदस्य, अनुसूचित जाती प्रतिनिधी, अनुसूचित जमाती प्रतिनिधी व एक सामाजिक कार्यकर्ता यांचा समावेश असतो.या सर्वांचा कालावधी ३ वर्षाचा असतो.प्रत्येक महिन्यातुन एकदा बैठक घेऊन बैठकीचा अहवाल तहसीलदारांना पाठवावा लागतो.सर्व दक्षता समित्यांच्या बैठका वेळच्या वेळी घेतल्या जातात की नाही याची खातरजमा जिल्हास्तरावरील अपर जिल्हाधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.दक्षता समितीची कामे शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार जीवनावश्यक वस्तुंचा पाठपुरावा स्वस्त धान्य दुकानांतुन केला जातो किंवा नाही हे तपासणे, बनावट , खोट्या शिधापत्रिका व शिधापत्रिका न मिळालेल्या गरजु रहिवासी याबाबत आढावा घेणे, धान्य दुकानातून गैरप्रकारांना आळा घालणे, गावातील प्राप्त तक्रार नोंदवही तपासणे व इतर अशी अनेक कार्ये दक्षता समिती मार्फत पार पाडली जातात मात्र दक्षता समितीतील पदाधिकारी केवळ आता नामधारी राहीले असुन कागदोपत्रीच दक्षता समित्या अस्तित्वात असुन त्या सक्षम करण्यात याव्यात आणि हलगर्जीपणा करणारांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.महाराष्ट्र शासन व प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत शासकीय स्वस्त धान्य दुकानातुन रेशनकार्ड धारकांना वाटप करण्यात येणारे गहु, तांदूळ,डाळ आदि धान्य निकृष्ट दर्जाचे ३-४ वर्षापुर्वीचे पिवळसर,काळसर रंगाचे किडलेल्या अवस्थेत तसेच माती,खडे आदी मिश्रण असलेले आढळून येत असुन जनावरेही तोंड लावणार नाहीत असे निकृष्ट धान्यांचे वाटप करण्यात येत असून नविन धान्यांचे वापट करावे. निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.रेशन दुकानदाराने दर्शनी भागात दक्षता समिती सदस्यांची नावे लावावी,दर्शनी भागात लाभार्थ्यांच्या याद्या लावणे, धान्य दराचे फलक दर्शनी भागात लावणे, तक्रार नोंदवही उपलब्ध करून देणे, धान्यांचे नमुने दर्शनी भागात ठेवणे आदि महाराष्ट्र अनुसूचित वस्तू वितरणाचे विनियमन आदेश १९७५ मधील तरतुदीचे तसेच प्राधीकार प्रतितील अटी शर्थीचा भंग केल्याचे दिसून येते. त्या अंतर्गत स्वस्त धान्य दुकानांचे प्राधिकार पत्र ३ महिन्यांकरीता निलंबित करण्याचे अधिकार आहेत.मात्र जिल्हा पुरवठा अधिकारी व तहसीलदार संबंधित प्रकरणात चौकशी व कारवाईस जाणिवपूर्वक टाळाटाळ करताना दिसुन येतात. संबंधित प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077